स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**STUDENT WELFARE DEPARTMENT**

Phone: (02462) 229525
Fax : (02462) 229572
Website: www.srtmun.ac.in
E-mail: dswsrtmunm@gmail.com

जा.क्र.वि.क/दुष्का/मदत/२०१५–१६/१५ दि. ०५/०१/२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व सलग्नित महाविद्यालये,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड.

विषय : दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सद्या मराठवाड्यात सर्वत्र कोरड्या दुष्काळामुळे भीषण अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये एकूण चार जिल्हे येतात. नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या चारही जिल्ह्यांमध्ये दुष्काळामुळे जनजवीन विस्कळीत झाले आहे. प्रामुख्याने आर्थिक समस्येला सामान्य माणसाला, विद्यार्थ्यांना तोंड दयावे लागत आहे. अवर्षणामुळे निर्माण झालेल्या या संकटाला सर्वांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संघटितरित्या सामोरे जाणे आवश्यक आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, महाविद्यालये व विद्यापीठ यांचे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत करणे हे नैतीक कर्तव्य आहे. या पार्श्वभूमीवर वार्षिक स्नेहसंमेलनाला लागणार वेळ आणि पैसा याचा विचार करता नेहमीच्या पध्दतीने स्नेहसंमेलन घेऊ नये.

दुष्काळग्रस्त परिसर म्हणून विद्यापीठ व विविध महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून, विद्यार्थ्यांना व विविध विद्यार्थी संघटना यांना आवाहन करण्यात येत आहे की, आपण आपल्या महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रद्द करुन किंवा एक दिवसाचा साजरा करुन स्नेहसंमेलनाचा नियोजीत निधी दुष्काळग्रस्त गरजू विद्यार्थ्यांना मदत म्हणून देण्यात यावी. या आवाहनाला सर्व प्राचार्य, विद्यार्थी संघटना व विद्यार्थी सकारात्मक प्रतिसाद देतील अशी विद्यापीठाची धारणा आहे.

स्वाक्षरीत/–
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग.